# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१
## फोन नं.(०२०) २६०५०६४१

**ई-मेल आयडी :-** comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in


जा.क्र.रासनिप्रा/ना.अ ठेव व शुल्क निश्चित/सन २०१४/731 दिनांक :-12/११/२०१४

**वाचावे :-** १. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम २३.

**प्रस्तावना :**

शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, दिनांक ११/०९/२०१४ अन्वये सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्या संबंधीचे नियम अधिसुचीत केले आहेत व ते अंमलात आले आहेत. सदर नियमातील नियम २३ नुसार सहकारी संस्थांचे प्रकार व कार्यक्षेत्राप्रमाणे उमेदवाराची अनामत ठेव व नामनिर्देशन अर्ज शुल्क निश्चित करण्यात आले आहे. सदर नियम २३, उपनियम (१) मधील संस्थांप्रकारामधील अनुक्रमांक ४ मध्ये "संस्थांचे कार्यक्षेत्र एक गाव अथवा एक प्रभाग" असलेस उमेदवार अनामत ठेव व नामनिर्देशन अर्ज शुल्क विहीत केले आहे. तथापी सदर नियमांचे अवलोकन केले असता एका गावापेक्षा अथवा एका प्रभागापेक्षा जास्त तसेच तालुका कार्यक्षेत्रापेक्षा कमी कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्थांबाबत उमेदवार अनामत ठेव व नामनिर्देशन शुल्क विहीत केलेले नाही. त्यामुळे या नियमातील तरतुदी मध्ये एका गावापेक्षा जास्त गावे मात्र तालूका कार्यक्षेत्रापेक्षा कमी कार्यक्षेत्र अथवा एका प्रभागापेक्षा जास्त प्रभागासाठी उमेदवार अनामत ठेव व नामनिर्देशन अर्ज शुल्क निश्चित करने आवश्यक आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, नियम २३ मधील परंतुका नुसार अशा संस्थांसाठी उमेदवाराची अनामत ठेव ठरवण्याचा अधिकार प्राधिकारणास प्राप्त आहेत. त्यास अनुसरुन तसेच प्राधिकरणास समर्थ करणाऱ्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: आदेश :-**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, नियम २३ मधील परंतुकानुसार प्राप्त अधिकारान्वये सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत भरावयाच्या अनामत ठेव रक्कम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| **संस्था प्रकार** | **अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवाराव्यतिरिक्त इतर उमेदवारासाठी ठेव रक्कम** | **अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारासाठी ठेव रक्कम** | **नामनिर्देशन अर्ज शुल्क** |
|---|---|---|---|
| संस्थेचे कार्यक्षेत्र एका पेक्षाजास्त गावे अथवा एका पेक्षा जास्त प्रभाग असेल तर | १००० | ३०० | १०० |

**सदरचे आदेश मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे मान्यता व निर्देशानुसार निर्गमीत करण्यात येत आहेत.**

१२/११/१४

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य , पुणे

प्रति :-

सर्व संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी /तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी

त्यांना कळविण्यात येते की, वरील आदेश सर्व प्राधिकृत अधिकारी व संस्था यांचे निदेर्शनास आणून देण्यात यावेत.

प्रत माहितीस्तव – विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :

१. मा.सचिव, सहकारी, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे
४. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस, वरळी मुंबई ४०० ०१८.
५. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.